REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# शहा मुंतोजी बामणी यांचा धार्मिक दृष्टिकोन

उपमुख्याध्यापिका सौ. सुरैय्या जाहागिरदार
एम. ए. पानगल हायस्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज. सोलापूर.


## प्रस्तावना :

शहा मुंतोजी बामणी हे मुस्लीम संत परंपरेतील महत्त्वाचे कवी होत. त्यांना 'मृत्यूंजय' या नावानेही ओळखले जाते. शहा मुंतोजी बामणी हे अज्ञानसिद्धांचे समकालीन कवी आहेत. त्यांचा हिंदू रीतीरिवाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अद्वैत तत्त्व मानणारा आहे. शहा मुंतोजी बामणी यांनी जवळपास दहा ग्रंथांची रचना केली आहे. त्या ग्रंथांमध्ये सिद्धसंकेत प्रबंध, अनुभवसार, अमृतसार, अद्वैत प्रकाश, प्रकाशदीप, स्वरूप समाधान, अमृतानुभव, जीवोद्धरण, पंचीकरण, गुरूलीला, पदे, अभंग यांचा समावेश होतो. आध्यात्माचा धागा त्यांनी प्रत्येक ग्रंथात गुंफलेला आहे. मुंतोजीनी परमेश्वराविषयी चिंतन केलेले आहे. विठ्ठलाचा उपासक असणारा हा संतकवी विठ्ठलाच्याच कृपेने पुढे आनंद संप्रदायाशी जोडला गेला. विवेकसिंधूची प्रत आणि कल्याणीच्या सहजानंद स्वामीला गुरू करण्याचा आदेश दृष्टांतरूपाने मिळाला. स्वामी सहजानंद यांच्यामुळे त्यांना ज्ञानप्राप्त झाले. आनंद संप्रदाय आणि सूफी संप्रदाय यांचा एकत्रित मेळ शहा मुंतोजी बामणी याच्या ठिकाणी एकवटला आहे. त्यांनी रचलेल्या 'पंचीकरण' या छोट्या ग्रंथाच्या सुरूवातीलाच हिंदू–मुसलमान यांच्या समन्वयाच्या चार ओळी आलेल्या आहेत.

''शाह मुंतबजी बामणी
जिनमे नही मनमानी।
पंचीकरण का खोज किये।
हिंदू–मुसलमान येक कर दिये।।''

एक समन्वयाचा विचार मांडणारा आणि वेदान्त तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारा संतकवी म्हणून शहा मुंतोजी बामणी यांचा उल्लेख करावा लागतो. वैदिक परंपरेला अनुसरून विचार मांडणाऱ्या वारकरी संप्रदायातील संतांप्रमाणे शहा मुंतोजी बामणी यांनी आपले विचार मांडलेले आहेत. त्यांनी विठ्ठलभक्तीचा आणि हिंदू गुरूचा पुरस्कार केल्यामुळे त्यांचा महायोगी म्हणून गौरव केला जातो.

शहा मुंतोजी बामणी हे अद्वैत तत्त्व मानणारे आहेत. त्यांच्या काव्यात परमेश्वराची भक्ती भरलेली आहे. त्यांचे समग्र काव्यलेखन अध्यात्मरसाने समरसून गेलेले आहे. शहा मुंतोजी बामणी यांनी आपल्या लेखनातून कूर्म अवतार आणि अठ्ठ्याऐंशी सहस्त्रऋषींचे वर्णन केलेले आहे. शहा मुंतोजी बामणी म्हणतात की,



तयाप्रति ईश्वर सांगत। आत्मा चिन्मात्रा अव्यक्त।।

आत्मा अमर आहे. त्याला मरण नाही. तो ईश्वराच्या अधिन आहे. ब्रह्म हा अव्यक्तांना प्रकाशित करणारा आहे. जीवाला त्याचे ज्ञान करून देणारा आहे. आत्मा अद्वितीय अमर्याद आहे. आत्म्याच्या ठिकाणी दुसरी वस्तू मानता येत

नाही. परब्रह्म हीच वस्तू अस्तित्त्वात असून दुसऱ्या वस्तू शब्दमात्र असा त्याचा सहजसंबंध आहे.

परमेश्वर अभिन्न, अखंड, निराकार आहे. सर्व दृश्यस्वरूपाचा निरास करून परमेश्वराला अभिन्न अखंड जाणावे. जाणीव झाल्याविना मुक्ती नाही. ही शहा मुंतोजी बामणीचीं श्रद्धा आहे. जाणिवेशिवाय सत्याचे स्वरूप स्पष्ट होत नाही. सत्याचे स्वरूप स्पष्ट झाले नाही की मन ग्रासते. अशी जाणिवेविशषयी त्यांची विचारधारा आहे. भक्ती, ज्ञान, विरक्ती तनमनाने केल्यास गुरूची प्राप्ती होते. तो त्यांच्या कृपेला पात्र होतो. मुंतोजी म्हणतात की,

करूनि सर्व दृश्याचा निरासु।
करिजे द्रष्टा आत्मा स्वयंप्रकाश।
अखंड परमेश्वर। अभिन्न जाण।।

आत्मा स्वयंप्रकाशी आहे. परमेश्वर अखंड असल्याची जाणीव आपल्याला व्हावी असे शहा मुंतोजी बामणी यांचे म्हणणे आहे.

प्रत्येकाने परमेश्वर भक्ती करावी, परमार्थ मिळवावा. देव प्रत्येक कणाकणात सामावलेला आहे. भक्ताने ज्ञानाची कास धरावी. शहा मुंतोजी बामणी यांचा भर मनशुद्धी व ज्ञान यावर आहे. माणसाचे मन विकारानी भरलेले आहे. हे मन स्वच्छ व्हावे, परमेश्वराकडे आकर्षित व्हावे. जेणेकरून भक्तीसाधना सुरळीत होईल. अमृतानुभव या ग्रंथात आदिमूर्ती आत्मरूप अशा ओंकाराला नमन केले आहे. मुंतोजी बामणी पूर्णपणे वेदांती तत्त्वज्ञानाचा अवलंब करतात. कुराणाची तत्त्वे अद्वैती आहेत, असे मुंतोजी मानतात. मुंतोजी आपल्या काव्यातून अद्वैती व अद्वैती परब्रह्म मानतात. प्रकाशदीप या ग्रंथाच्या सुरूवातीला त्यांनी श्रीयेकनाथम असे म्हटलेले आहे. यातून शहा मुंतोजी बामणी यांची धर्मनिष्ठा व धार्मिकता स्पष्ट होते. मुंतोजी म्हणतात की,

आदिपुरूष। तुज पासाव सकल।
गणेश शारदा कविकुल। गुरूशिष्य सकु।
चातुर्य जाहले। म्हणोनि तुज तुझे स्तवन।
करिता उजळले ज्ञान।।

या काव्यातून शहा मुंतोजी बामणी यांनी वेदांती पारंपरिक सिद्धांत मांडला आहे. तू निराकार आहेस, तूच या जगाचा निर्माता आहेस. तू रचनाकार आहेस. तूच एके दिवशी या जगाचा नाश करणारा आहेस. अशी वैचारिक परंपरा मुंतोजींनी मानली आहे.अद्वैत प्रकाशात सर्व सर्वत्र अद्वैती तत्त्वाचे स्वरूप ते विशद करतात. अद्वैत प्रकाश या ग्रंथात आत्मपरतेचा ध्यास स्पष्ट होतो. गणेश नमनाच्या पूर्वी श्रीगुरूला नमन केले आहे. श्रीगणेशाला आधी स्मरून नंतर कोणत्याही कार्याचा शुभारंभ करावा हा पारंपारिक संकेत आहे. हा संकेत मुंतोजी मानतात. गणेशाला नमन केल्यानंतर त्यांना अभिप्रेत असलेला अद्वैती विचार त्यांनी सोडला आहे.

ओम नमो जी ये दंता उत्तमा।
तू ज्ञानदिनकरू सर्वकामा।
दावी शोधूनि आत्माराम गौरी सुत।।

अशाप्रकारे त्यांनी गणेशाची स्तुती केलेली दिसून येते. श्रीगणेश नमनानंतर मुंतोजी सकल सिद्धीला नमन करतात. मुंतोजी शास्त्राचा गाढा अभ्यास केला आहे. तत्त्वाचा, वाङ्मयाचा व त्यांनी केलेल्या शास्त्रविषयक अभ्यासाचा मागोवा घेताना त्यातून त्यांच्या चिंतनशीलतेचे दर्शन घडते.

शोधूनि वेद शास्त्र पुराण
मंथन सार तेचि बोलणे
जे सर्व ग्रंथी होती देखणे
ते जाणती चतुर।।

वेद शास्त्रांचा शोध करून सार काढून बोलावे. अशी विचारसरणी ग्रंथात आली तर त्याचा आस्वाद घेता येईल. अशा ग्रंथातील विचार चतुराना लवकर समजतील. अखंड सुख देणारा, सर्व जगाची तहान–भूक भागविणारा, जगाचा नियोजनकार परमेश्वर आहे. अद्वैतप्रकाश या ग्रंथात जो धार्मिक दृष्टीकोन मुंतोजींनी प्रकट केलेला आहे. तसाच धार्मिक दृष्टीकोन मुंतोजीनी प्रकट केलेला आहे. तसाच धार्मिक दृष्टीकोन सिद्धसंकेत या ग्रंथात रेखाटले आहे. सिद्धसंकेत या ग्रंथात गणेशाची सुंदर रचना आहे. मुंतोजीनी आपल्या काव्यप्रतिभेची चुणूक येथे दर्शविली आहे. सिद्धसंकेत या ग्रंथात सुरूवातीला गणेशाला नमन करताना श्री असा शब्द योजिला आहे. या ग्रंथातील मंगलाचरण तीन प्रकारचे आहे. वस्तूरूप, नमस्काररूप, आशीर्वादरूप असे तीन मंगलाचरण आहेत. गणेशाचे अनेक रूपक, उपमा, अलंकारानी सुंदर व कलात्मक वर्णन केले आहे. श्री गणाधिपतीला वंदन करून गुरूला नमन केले आहे. सिद्धसंकेत या ग्रंथात दीर्घ असे गणेश रूपक रेखाटलेले आहे.

मुंतोजीचे काव्यप्रयोजन हे आध्यात्मिकच आहे. सर्वधर्मसमभावाचे प्रतिक आहे. मुंतोजी धार्मिक एकात्मतेचा तारा आहेत. मुंतोजीचे काव्य आध्यात्मिक वर्णनाने अत्यंत प्रभावी झालेली आहे. मुंतोजी मुळातच रसिक व भक्त असल्याने त्यांच्या काव्याला भक्तीची व परमार्थाची झळाळी लाभलेली आहे. मुंतोजीने गणपतीचे वर्णन मोठ्या कौशल्याने वर्णन केले आहे. वरील विवेचनावरून शहा मुंतोजी बामणी यांचा धार्मिक दृष्टीकोन प्रकट होतो.

**संदर्भग्रंथ :–**

१) अ. ह. पठाण, मुस्लीम मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २०१४.
२) रा. चि. ढेरे, मुसलमान मराठी संतकवी.
३) यु. म. पठाण, संतसाहित्य पुर्नमुल्यांकन, अनुपम प्रकाशन, औरंगाबाद, १९९२.
४) शेख जुल्फी, मृत्यूंजय, गुरू प्रकाशन, नागपूर, १९९९.
५) एल. पी. माथूर, जी. एन. माथूर, मुघलकालीन भारत, जैन पुस्तक मंदीर, जयपूर, १९९६.



उपमुख्याध्यापिका सौ. सुरैय्या जाहागिरदार
एम. ए. पानगल हायस्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज. सोलापूर.